



साप्ताहिक
www.dongarcharaja.com
वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे






■ वर्ष ११ ■ अंक ५ ■ शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

# मराठा तुफान; मुंबईच्या तयारीत

## कुठुनही घुसा पण मुंबईत दिसा

**डोंगरचा राजा विशेष वृत्त..**

**येत्या २९ तारखेला मराठा आरक्षणाच्या लढाईत मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाने मुंबईत मराठा तुफान धडकणार आहे. त्या अनुषंगाने वडवणी तालुक्यातील गावागावात चावडी बैठका घेतल्या जात आहेत. या व्यापक बैठकांमध्ये फक्त आणि फक्त एकच लक्ष मराठा आरक्षणाच्या लढाईत मराठ्यांचा पुन्हा इतिहास घडवा असे आवाहन केले जात आहे.**

वडवणी तालुक्यातील मराठा समाजाच्या प्रमुख लढवय्या बहाद्दर सैनिकांनी तालुक्यातील ३६ ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या ४२ गावांना तसेच वाड्या,वस्त्यांवर जाऊन भेटी गाठी घेऊन भर चौकात चावडीवर जाहीर बैठका घेतल्या आहेत. तालुक्यातील डोंगराळ भागात तसेच गंगथडी भागात हे मराठा सैनिक रात्रंदिवस मेहनत घेऊन मुंबईला केव्हा जायचं,कसं जायचं,का जायचं,काय करायचं,काय मिळवायचं, कुणासाठी मिळवायचं,याचा फायदा काय.? ही सर्व माहिती तळागाळातील मराठा समाज बांधवांना समजावून सांगत आहेत. गरजवंत मराठ्यांचं आता सर्वकाही ठरलंय. येत्या २७ ऑगस्टला कसं आणि कुठून मुंबईला पोहोचायचं याचं गणित सुध्दा सर्व ठिकाणी समजून,

सोडवुन दाखवलं जात आहे. वडवणी तालुक्यातील प्रमुख बहाद्दर मराठा सैनिकांनी चिंचवण, सोन्नाखोटा, पिंपळटक्का



,चिखलबीड, खंडोबाची वाडी, खडकी, देवळा, मामला,साळींबा, पिंपरखेड, कवडगांव, मोरेवाडी, हिवरगव्हाण, चिंचाळा, मोरवड, तिगांव, केंडे पिंपरी, धानोरा, खळवट लिमगाव, देवगाव ,परडी माटेगाव, बाहेगव्हाण, काडीवडगाव, कुप्पा,देवडी, हरिश्चंद्र पिंपरी,उपळी, खापरवाडी, मोरेवाडी, कोठारबन,चिंचोटी, ढोरवाडी,लोणवळ बाबी, पिंपळा रुई, कान्हापूर, पुसरा, दुकडेगांव, चिंचवडगाव, सह आदी गावांतील चावडीवर बैठका घेऊन करोडो मराठे मुंबईला निघणार आहेत. आपण सुद्धा आता थांबायचे नाही. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा सांगावा आलाय.. ही मराठ्यांच्या अस्तित्वाची लढाई असल्याने येत्या २७ ऑगस्ट रोजी सर्वांनी मुंबईकडे कुच करायची आहे. अशाप्रकारचे आवाहन केले जात आहे. या आवाहनाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र सध्या तालुक्यात दिसत आहे.

# आ.प्रकाश सोळंकेंचा विश्वास सार्थ ठरवणार:अ‍ॅड.विकास मुंडे

वडवणी:प्रतिनिधी

चिखलबीड चे माजी सरपंच अ‍ॅड. विकास मुंडे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वडवणी तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र नुकतेच विद्यमान आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते व युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या उपस्थितीत त्यांना देण्यात आले. अ‍ॅड.विकास मुंडे यांच्या निवडीमुळे त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमचे नेते आ.प्रकाश सोळंके व युवा नेते जयसिंग सोळंके यांनी आमच्यावर सोपवलेली





जबाबदारी सक्षम पणे पार पाडुन त्यांनी टाकलेला विश्वास सार्थकी लावणार असल्याचे मत नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष अ‍ॅड.विकास मुंडे यांनी व्यक्त केले.

वडवणी तालुक्यातील डोंगराळ भागात वसलेले चिखलबीड हे गाव याठिकाणी आपल्या संघटन कौशल्याने व मागच्या ग्रामपंचायत सरपंच पदाच्या कार्यकाळात सर्वांसोबत स्नेहाचे संबंध जोपासत गाव विकासाच्या दृष्टीने आगेकूच करण्यासाठी प्रयत्न करणारे तसेच माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके व युवा नेते जयसिंग सोळंके यांचे विश्वासू म्हणून ओळख असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तरुण तडफदार कार्यकर्ते अ‍ॅड.विकास मुंडे यांची ओळख आहे. त्यांनी मागील सर्व निवडणुकीत पक्षाने सोपवलेली जबाबदारी सक्षम पणे पार पाडत आ.प्रकाश सोळंके व युवा नेते जयसिंग सोळंके यांचा विश्वास संपादन केला. या दोघांच्या आदेशानुसार पक्षाचे काम इमानेइतबारे करत राहीले. त्यांच्या या कामाची दखल घेऊन माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते व युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या उपस्थितीत त्यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वडवणी तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती पत्र प्रदान करून ही नियुक्ती करण्यात आली.अ‍ॅड विकास मुंडे यांचे या निवडीमुळे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.



## वडवणी शहरात भव्य स्वागत..

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आमदार श्री. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली जेष्ठ नेते राजाभाऊ मुंडे व युवा नेते बाबरी मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नुकताच जाहीर प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या या सर्वांचं मनापासून स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. असं सांगितलं. या कार्यक्रमाच्या निमित्तानं उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांना त्यांनी संबोधित केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जनसेवेची विचारधारा सर्वांना समजावूनही सांगितली. हा शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र असून त्यांच्याच आदर्श विचारांवरती पक्षाची वाटचाल सुरू असल्याचे मत व्यक्त केले.




## संपादकीय

# अमेरिकेची चालबाजी

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी हिंसक कारवाया करणाऱ्या संघटनांना 'परदेशी दहशतवादी संघटनां' च्या यादीत टाकण्याचा ट्रम्प प्रशासनाचा निर्णय अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यातील जवळीकता आणखी वाढविणारा आहे.

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानची निर्मिती झाली, तेव्हा बलुचिस्तानने स्वतंत्र राहणे पसंत केले. मात्र, पाकिस्तानने लष्करी कारवाईद्वारे बलुचिस्तानचे विलीनीकरण केले. तेव्हापासून तेथील जनता स्वातंत्र्यासाठी लढत आहे. या जनतेला सत्तेत न्याय्य वाटा देण्याऐवजी, त्यांच्या आकांक्षा जाणून घेण्याऐवजी पाकिस्तान त्यांची पिळवणूक करीत आला. परिणामी बलोच जनतेचा क्षोभ वाढत गेला. यातूनच ' बलुचिस्तान लिबरेशन आर्मी ' (बीएलए) यांसारख्या संघटना आक्रमक झाल्या. गेल्या काही काळात 'बीएलए'सह आणखी काही संघटना पाकिस्तानात हिंसक कारवाया घडवत आहेत. पाकिस्तान त्यांच्याकडे दहशतवादी म्हणूनच पाहत आहे. आता अमेरिकेनेही 'बीएलए' आणि त्याच्याशी संलग्न संघटनांना दहशतवाद्यांच्या यादीत टाकले आहे.

महिला, बालके यांसह निरपराध जनतेला लक्ष्य करणे समर्थनीय ठरत नाही. त्यामुळे बलुचिस्तानातील फुटीरतावाद्यांच्या हिंसक कारवाया निषेधार्ह ठरतात; परंतु बलोच जनतेवरील पाकिस्तानकडून होत असलेला अन्यायही समर्थनीय नाही. या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या निर्णयाकडे पहावे लागेल. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे दुसऱ्यांदा अध्यक्ष झाल्यापासून पाकिस्तान त्यांच्याशी जवळीक वाढविण्याच्या प्रयत्नात आहे. अमेरिकेला हवा तसा व्यापार करार करण्यास भारत तयार नसल्याने नवी दिल्लीवर दबाव टाकण्यासाठी ट्रम्पही पाकिस्तानशी जवळीक वाढवीत आहेत. गेल्या दशकात पाकिस्तान आणि चीन यांची नजीकता वाढली असून, बीजिंग आर्थिक मार्गिका ( सीपेक ) विकसित करीत आहे.

पाकिस्तान चीनच्या पूर्णपणे कह्यात जाऊ नये, यासाठी अमेरिकाही प्रयत्नशील आहे. दुर्मीळ खनिजांबाबत चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अमेरिका पर्यायाच्या शोधात आहे. पाकिस्तान हा त्यासाठीचा एक पर्याय ठरू शकतो. बलुचिस्तानात नैसर्गिक वायूंचे साठे असून, ते बाहेर काढण्यासाठी मदत करण्याची तयारी अमेरिकेने दर्शविली आहे. या सर्व बाबींसाठी बलुचिस्तानात सुरक्षितता असणे आवश्यक असल्याने आणि याद्वारे पाकिस्तानला जवळ करता येत असल्याने तेथील फुटीरतावादी संघटनांना दहशतवादी घोषित करण्याचे पाऊल अमेरिकेने उचलले आहे.

# लोकनेते स्व. बाबुराव आडसकर पुण्यतिथीला सामाजिक व सांप्रदायिक ऐक्याची जोड

## जनसेवेचा व विकासाचा वारसा रमेश आडसकरांच्या हातून पुढे





वडवणी:प्रतिनिधी

जनतेच्या हृदयात घर करणारे, प्रामाणिक व पारदर्शक कारभारासाठी ओळखले जाणारे माजी आमदार स्व. बाबुराव आडसकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी रक्तदान शिबिर, सर्व रोग निदान शिबिर,महाप्रसाद व किर्तन यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळपासूनच गावोगावी व परिसरातून आलेल्या नागरिकांच्या उपस्थितीने ठिकाण जनसागराने भरून गेले.

कार्यक्रमास ग्रामस्थ, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते,महिला व युवक यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. रक्तदान शिबीर व सर्वरोग निदान शिबिरात शेकडो युवक-युवतींनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले, तर परिसरातील शेकडो रुग्णांनी रोगनिदान शिबिराचा लाभ घेतला. मोफत औषधोपचार व आरोग्य मार्गदर्शन देऊन पुण्यतिथीचा सामाजिक संदेश अधोरेखित करण्यात आला.तर कीर्तनकार ह.भ.प.भगवान महाराज वरपगावकर यांनी किर्तनातुन समाजप्रबोधन केले व तात्याविषयी आठवणी सांगितल्या.श्रद्धांजली अर्पण करून भाजपाचे प्रवक्ते राम कुलकर्णी व उद्धव बापू आपेगावकर यांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला व बाबुराव आडसकर यांनी आपल्या कारकिर्दीत केलेली विकासकामे, जनतेशी असलेले आत्मीय नाते आणि शेतकरी-गरीब यांच्या हक्कासाठी घेतलेली झुंज यांची आठवण उपस्थितांनी व्यक्त केली.

स्व.बाबुरावआडसकर यांच्या कार्याचा वारसा त्यांचे सुपुत्र रमेशराव आडसकर सक्षमपणे पुढे



नेत आहेत. सामाजिक बांधिलकी, विकासाभिमुख दृष्टी आणि जनतेशी सलगी ही बाबुराव आडसकर यांच्या शैलीची परंपरा आजही टिकून आहे.

स्व. बाबूरावजी आडसकर साहेब यांनी राजकारणा बरोबरच सांप्रदायिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य केले. रमेशराव आडसकर, ऋषीकेश भैय्या आडसकर,अर्चनाताई आडसकर, शशि भैय्या आडसकर, रंजित दादा आडसकर व संपूर्ण आडसकर कुटुंब हे तात्यांचा वारसा पुढे घेऊन जात आहेत त्याचेही कौतुक आहे. सहकार, शैक्षणिक,सामाजिक,राजकीय क्षेत्रात स्व. बाबूरावजी आडसकर (तात्या) यांनी सामान्य नागरिकांशी नाळ कायम जोडण्यासाठी त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अहोरात्र काम केले, तोच वसा घेऊन आडसकर कुटुंब बीड जिल्ह्यात काम करेल असा विश्वास रमेशराव आडसकर यांनी व्यक्त केला.

लोकनेते, स्व.बाबूरावजी आडसकर (तात्या) यांच्या नवव्या पुण्यतिथीनिमित्त भाजपाचे राज्य प्रवक्ते राम काका कुलकर्णी,उद्धव बापू आपेगावकर, आंबा साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन दत्ता आबा पाटील, अंकुशराब इंगळे सभापती कृ.उ.बा.स.,माजी जि.प.सदस्य सुरेश तात्या पाटील, मनोहर डाके, राजेश्वर आबा चव्हाण जिल्हा अध्यक्ष रा.कॉ. पा.बीड, राजाभाऊ औताडे, दिलीप गुळभिले, नेटके साहेब, बबन भैय्या लोमटे, उदयसिंह दिख्खत, किर्दक साहेब, राजकिशोर पापा मोदी, सौ. सितातार्ई बनसोड नगराध्यक्ष केज, माजी जि.प. सदस्य किसन कदम, बंडू भनसाळी, उत्तमराव थोरात, शिवाजीराव देशमुख,शेख गफार,अमर पाटील, सुशील अंधारे, अझहर इनामदार, हनुमंत काका मोरे, अनंतदादा लोमटे, कमलाकर कोपले, शिवसेनेचे वडवणी तालुकाप्रमुख विनायक मुळे, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष राम सावंत, सा.डोंगरचा राजाचे संपादक अनिल वाघमारे, सा. गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे आदि सामाजिक,राजकीय,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व रोग निदान व रक्तदान शिबीरा निमित्त स्वामी रामानंद तीर्थ अंबाजोगाई येथील डॉ. रूचा पाटील, डॉ. सचिन काटाळे, डॉ. निशांत, डॉ मोहम्मद तारीक, डॉ. सचिन ढवारे, डॉ. अनिकेत मुसळे, डॉ. साहील मुंडे, डॉ.मंदार दाभाडे,डॉ. प्रियंका घुले, डॉ. अतुल डोईफोडे, डॉ. नेहा सोनवणे, डॉ. कार्तिक कोलापरथी,डॉ.अजिंक्य राठोड,डॉ.अनंत पवार हे वैद्यकीय पथक उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुरेश शिनगारे सरांनी केले.

# वडवणीच्या विश्वनाथ मंदिरात शुक्रवारपासून शिवमहापुराण कथा

## आसलकर यांच्या माऊली समूहाची शिवभक्तांना मेजवानी

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ मंदिर याठिकाणी श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून करण्यात आले आहे. तर या कार्यक्रमाची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी होणार आहे. तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला भगिनींसह शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन दुपारी २ ते ५ या वेळेत श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन विनोद विश्वासराव आसलकर, विक्की विश्वासराव आसलकर व समस्त माऊली समूह यांच्या वतीने करण्यात आले आहे.

वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे येथील वस्त्रोद्योग क्षेत्रातील नामांकित युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या



जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ शंभू महादेवाचा परिसर हा नेहमीच शिवभक्तांच्या गर्दीने भरलेला असतो. याच ठिकाणी महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकार ह.भ.प.राजाभाऊ महाराज म्हेत्रे जामखेड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून दैनंदिन दुपारी २ ते ५ या वेळेत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सायंकाळी ५ ते ७ या वेळेमध्ये हरिपाठ व महिलांचा फुगड्यांचा यांचा कार्यक्रम होईल. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर हे या शिवमहापुराण कथेचे प्रवक्ते असून त्यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबणार आहे. याप्रसंगी हरिपाठ नेतृत्व संगीत विशारद ह.भ.प.हरिभाऊ महाराज काळे, साथ संगत गायन गंधर्व ह.भ.प.सतीश महाराज खपके, मृदंगाचार्य ह.भ.प.बाबा महाराज मुरुमकर यांची त्यांना साथ लाभणार आहे. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिलेले असून यांविषयी सविस्तर असे वर्णन केलेले आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरणार असून या कथेची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी महाप्रसादाने होणार आहे. यादिवशी सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये शिवमहापुराण कथा संपन्न होईल, त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांचे काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर लागलीच महाप्रसादाची पंगत सुरु होईल. या शिवमहापुराण कथेच्या आयोजनाची आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण झाली असून तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला, माता भगिनींसह सर्व शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक विनोद विश्वासराव आसलकर, विक्की विश्वासराव आसलकर व समस्त माऊली समूह यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# पत्रकार बाळासाहेब आडागळे यांचा सत्कार

माजलगाव :प्रतिनिधी

लवकरच प्रसारित होणार असलेल्या वनवा या लघु चित्रपट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या औचित्याने राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्कार जाहिर झाला असून या चित्रपटात काम करणारे अभिनेते बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांचा माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने माजलगाव परिसर चे संस्थापक संपादक तथा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रदीप कुलकर्णी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी मनोगतात प्रदीप कुलकर्णी म्हणाले की बाळासाहेब आडागळे यांनी पत्रकारिता क्षेत्रांमध्ये चांगले कार्य केले असून कमी वयात त्यांनी माजलगावची पत्रकारिता चांगलीच गाजवली आहे. त्यांनी आता अभिनयक्षेत्र निवडले असून या क्षेत्रात देखील ते चांगल्या प्रकारे काम करतील आणि आपल्या या अभिनयातून एक प्रकारचे समाज प्रबोधन करतील, अशी अपेक्षा आहे अशी अपेक्षा आहे.

त्यांना व अभिनेत्री सोनवणे यांना राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्कार जाहीर झाला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, आणि त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा प्रदान करतो. त्यांची उत्तरोत्तर अशीच प्रगती व्हावी आणि त्यांच्या हातून अभिनय क्षेत्रामध्ये चांगली कामगिरी घडावी अशा शुभकामना व्यक्त करतो अशा शब्दात प्रदीप कुलकर्णी यांनी त्यांच्या सत्काराच्या औचित्याने आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी संपादक परमेश्वर सोळंके, पत्रकार विष्णू उगले, पत्रकार अरविंद ओव्हाळ, पत्रकार अमर साळवे, पत्रकार विजय कापसे , पत्रकार संतोष रासवे, पत्रकार वाजेद पठाण, पत्रकार परमेश्वर चांदणे, पत्रकार शेख अखिल आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

सर्व उपस्थितांनी बाळासाहेब आडागळे आणि प्राची सोनवणे यांना हार्दिक शुभेच्छा प्रदान केल्या

# शेख मंजुर यांच्याकडून जनतेची दिशाभुल : मनोज साळवे

माजलगाव :प्रतिनिधी

श्रीधर साळवे विरुध्द जिल्हा अधिकारी बीड हा दिवाणी दावा श्रीधर साळवे च्या मालकीच्या ०० हे ५३ जमीनीवर अजहर खुर्शीद नाईक,शेख शौकत बाबा मिया,प्रिती निलेश बजाज, खलील शेख चाँद,अशोक दत्तात्रय साखरे व शेख मंजुर व सुनिल तौर यांनी सर्वांनी संगणमत करुन बेकायदेशीर मंडळी जमवुन राजकीय वरदहस्त व दांडकशाहीचा वापर करुन श्रीधर साळवे यांच्या ०५ गुंठे जमीनीवर अतिक्रमकन केल्याचा दावा आहे.सदर दाव्यामध्ये तुर्तास मनाई हुकमाचा अर्ज मा.न्यायालयाने फेटाळलेला आहे.तसेच सदर मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळताना मा.न्यायालयाने महत्वाचे निरिक्षण नोंदवलेले आहे.नकाशानुसार गट नं.२० च्या ७/१२ च्या उताऱ्यात जे क्षेत्र नमुद आहे.त्याप्रमाणे क्षेत्र वादी आणि प्रतिवादीच्या ताब्यात असल्याचे दिसुन येत नाही.नकाशाच्या दक्षिण बाजुला गढी ते माजलगाव रस्ता व पुर्व बाजुला शिवरस्ता असुन गढी ते माजलगाव रस्त्यामध्ये गट नं.२० मधील काही मिळकत व्यापली आहे.वादीने दाव्यात गढी ते माजलगाव रस्ता यामध्ये कोणाची मिळकत संपादीत झाली ती मिळकत कधी संपादीत झाली?प्रतिवादी असलेला शेख मंजुर यांनी खरेदी केल्यानंतर संपादीत झाली की,आधी संपादीत झाली या बाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच सदर प्रकरणात शेख मंजुर यांचीच जमीन रस्त्याच्या नियंत्रण रेषेत गेल्याचे मनोज साळवे यांच्याकडे ठोस पुरावे असुन अंतिम युक्तीवादावेळी स्वतःमा. न्यायालयात हजर होऊन पुरावे दाखल करणार आहे.

तसेच आयोगाचे पद रिक्त असल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात यांचीका दाखल केली होती. परंतु शासनाने आयोगाचे पद भरल्यानंतर खंडपिठातील याचीका मागे घेतली.तसेच चौकशीमध्ये बनावट कागदपत्राचा उलघडा न करता गुन्हे दाखल करण्याची तजबीज ठेवुन गुन्हा दाखल न केल्याचे आयोगाचे निर्देशनास आनुन दिल्यानंतर आयोगाने पोलीस अधिक्षक बीड यांना नोटीस बजावुन शेख मंजुर सह इतर अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे बाबत कळविले होते परंतु पोलीस अधिक्षक यांनी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्याचे आपेक्षीत असताना चौकशीचे आदेश दिले होते.त्यानंतर मनोज साळवे व इतर साक्षीदार जबाब देण्यासाठी पोलीस स्टेशनला गेले असता ए.पी.आय. मुंडे यांनी तक्रारदार व साक्षीदारांना पोलीस स्टेशनमधुन हाकलून दिले व सदर आदेशानुसार ए.पी.आय मुंडे यांनी चौकशी करणे आवश्यक होते.परंतु प्रत्येक्षात चौकशी न करता मंजुर यांच्या सांगण्याप्रमाणे मिलीभगत करुन कागदोपत्री अहवाल तयार करुन संबंधीत आयोगाला व अधीक्षक कार्यालयास सादर करुन दिशाभुल केल्यामुळे पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसुन गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती.शेख मंजुर हा श्रीधर साळवे यांच्या दिवाणी दाव्याचा आधार घेऊन जनतेची दिशाभुल करत आहे.मंजुर यांच्या म्हणन्यात कुठलेली तथ्य नाही.

# धुनकेश्वर महोत्सवानिमित्त केशव महाराज पवार यांचे किर्तन

धारुरःधुनकवाड गावचे ग्रामदैवत धुनकेश्वर देवस्थान येथे गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त चौथा सोमवार दि.१८ऑगस्ट रोजी ११ते १ किर्तनसेवा शिवचरित्रकार ह.भ.प.केशव महाराज पवार यांचे किर्तन होणार आहे तरी या पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.धुनकवाड येथील धुनकेश्वर देवस्थानात गेल्या नऊ वर्षांपासून ह.भ.प.भागवताचार्य श्रीराम महाराज शेळके यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या श्रावण महोत्सवाचे प्रति वर्षाप्रमाणे या ही वर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन चार सोमवारी नामवंत किर्तनकारांचे किर्तन होत असुन पहिल्या श्रावण सोमवारी भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके यांचे किर्तन झाले आहे.तर दुसऱ्या सोमवारचे किर्तन ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे यांचे झाले असून तिसऱ्या सोमवारचे किर्तन ह.भ.प.रामकृष्ण बापु रंधवे महाराज यांचे किर्तन झाले.तर चौथ्या श्रावण सोमवारी ची किर्तनसेवा शिवचरित्रकार ह.भ.प.केशव महाराज पवार यांच्या सुश्राव्य वाणीतुन होणार आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या हरिकिर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादाचे यजमान विक्रम रघुनाथ करांडे,मोहन यदा नांदे,पारराम मारुती यादव,गिन्यानदेव हरिभाऊ गावडे,त्रिंबक म्हतारबा यादव, अर्जुन सदाशिव डोंगरे,विठ्ठल जनार्धन डोंगरे,भागवत शामराव धोंगडे,राहुल तात्याराम खेलबुडे, छत्रभुज दादाराव नाईकवाडे,महादेव रामभाऊ यादव,वैजनाथ बाबुराव नाईकवाडे, शिवनारायण संदिपान करांडे,हनुमान श्रीरंग बजगुडे, विलास गंपू सत्वधर,सखाराम प्रभाकर मनेरी, रामचंद्र रघुनाथ कागणे,श्रीराम गणपती यादव, बाबुराव श्रीरंग तोंडे,कल्याण महादेव रोडे यांच्यासह धुनकेश्वर श्रावण महोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



युवा नेते अशोकराव गोंडे यांचे नातु/नात कु.गौरी गोविंद वरकड हिने आपला भाऊ आयुष गोविंद वरकड यास राखी बांधून रक्षाबंधन साजरा केला.

## जय बजरंग प्रतिष्ठाणच्या जिल्हाध्यक्षपदी गोरे

माजलगाव :तालुक्यातील वाघोरा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सावता महासंघाचे जिल्हाध्यक्ष सोपान गोरे यांची जय बजरंग प्रतिष्ठाणच्या जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.

जालना येथे दि.१० ऑगस्ट रोजी झालेल्या कार्यक्रमात सोपान गोरे यांना जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. यावेळी संस्थापक अध्यक्ष रामप्रसाद मुंदडा, सुभाषचंद्र देविदान, अंकुश राऊत, दिगांबर पेरे,मुन्ना गजबी,हिरालाल पिपरिये, पवन जोशी,बबनराव घायाळ, लक्ष्मण नेमाने, निलेश उपाध्याय,सुनील भावसार, संभाजी गोरे,संजय मुंदडा, गोविंद मुंदडा, गोविंद गाजरे सह आदी उपस्थित होते. दरम्यान सोपान गोरे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# लंडनचाही चाहता ‘बाबुराव’ झाला...!





**रवि राऊत**

माजलगावः अत्यंत सामान्य कुटुंबात ग्रामीण भागात एका दलित कुटुंबामध्ये जन्म घेवुन बालवयापासुन संघर्षाचा व कठीणाईचा सामना करत करत बहिष्कृत जिवन जगत लहानाचे मोठे होत ज्यांनी आपल्या डोळ्यादेखत हा वनवास पाहिला. मोहा या गावापासुन ते आज लंडन येथे होत असलेला बाबुराव पोटभरे यांचा सन्मान व गौरव हा त्यांच्या संघर्षमय जिवनाचे व स्वकर्तृत्वाचे द्योतक असल्याचे मत मा. आ. मोहनराव सोळंके यांनी व्यक्त केले तर मी लहानपणापासुन व्यवस्थेच्या विरोधात लढत राहिलो. समाजासाठी हक्काची व न्यायाची लढाई लढत राहिलो. ती लढाई लढत असतांना त्याकाळी समाजात मी तिरस्कार प्राप्त होतो मात्र आज ज्या गोष्टी आम्ही न्यायाने मागत होतो. त्या आज समाजमान्य झाल्यामुळे त्याच समाजात माझा पुरस्काराने गौरव होत आहे यासारखे मोठे समाधान माझ्यासाठी कोणतेच नाही असे भावनिक उद्गार बाबुराव पोटभरे यांनी काढले.

लंडन येथे होत असलेल्या सन्मान सोहळ्याच्या निमीत्ताने शहरामध्ये दि. १३ ऑगस्ट रोजी हॉटेल सुखसागर येथे आयोजित माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने आयोजन सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थांनी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर हे तर प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. प्रकाश आनंदगावकर, मोहन जगताप, सहाल चाउस, सभापती जयदत्त नरवडे, प्रभाकर साळेगावकर, राजेश घोडे, विजय साळवे, मुसद्दीक बाबा, खुर्शिद नाईक, उपसभापती श्रीहरी मोरे, सुरेंद्र रेदासणी, ज्ञानेश्वर मेंडके, शेख मंजुर, नासेरखान पठाण, नारायण होके, अरूण राउत, ओमप्रकाश मालपाणी, विनोद बजाज, रविंद्र कानडे, चंद्रकांत शेजुळ, डॉ. श्रेयश देशपांडे, डॉ. यशवंत राजेभोसले, बाळु ताकट, मुजम्मील पटेल, धम्मानंद साळवे, अॅड. नारायण गोले, अमोल शेरकर, नानासाहेब घोडके, एकनाथ मस्के, अॅड. भानुदास डक, बाजार समितीचे संचालक नंदकिशोर आगे, अमोल जाधव, भगवान आगे, कदीर पठाण, विठ्ठल पंडीत, सत्यभामा सौंदरमल, रंगनाथ निकम, राजेश क्षिरसागर, नवनाथ धाईजे, सय्यद सलिम, विठ्ठल जाधव यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत पत्रकार संघाच्या वतीने श्री. पोटभरे यांचा फेटा, शाल, पुष्पहार, गौतमबुध्दांची प्रतिमा देउन सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर म्हणाले की, माजलगाव तालुका पत्रकार संघ सातत्याने समाजात घडणा-या चांगल्या गोष्टींची दखल मागील २५ वर्षांपासुन घेत आलेला आहे. समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणा-यांची दखल घेवुन त्यांचा मान सन्मान सातत्याने केला जातो. पोटभरे यांना मिळालेला आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारामुळे त्यांचा सन्मान आहे असे सांगीतले. प्रास्ताविकात तुकाराम येवले यांनी माजलगाव पत्रकार संघाच्या सामाजिक कार्याचा परिचय दिला. यावेळी मोहन जगताप, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, प्रभाकर साळेगावकर, राजेश घोडे, विजय साळवे, उमेश मोगरेकर यांची समयोचित भाषणे होवुन बाबुराव पोटभरे यांना शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन नागनाथ पडलवार यांनी केले तर आभार सुभाष नाकलगांवकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुरूषोत्तम करवा, कमलेश जाब्रस, राज गायकवाड, दिनकर शिंदे, रत्नाकर कुलथे, हरिष यादव, दिनकर कुलथे, राजरतन डोंगरे, धनंजय माने, पांडुरंग उगले, दत्ता येवले, शेख बाबा, इम्रान पठाण, शेख फेरोज, विकास मस्के, दिपक टाकणखार, अशोक जाधव आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## प्रा.बडेंनी डोंगरपट्यात ज्ञानाची गंगा आणली

### भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांचे प्रतिपादन; भगवानबाबा विद्यालयात विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

वडवणी:प्रतिनिधी

संतश्रेष्ठ भगवानबाबा ईश्वरी अवताराचं स्वरूप असुन तत्कालीन काळात त्यांनी शिक्षणाचे महत्व पटवुन देताना स्वत:च्या जीवनाचा उद्धार करण्यासाठी काहीही करा पण लेकरांना शिक्षण द्या ही त्यांची शिकवण समाज उद्धारासाठी कामी आल्याचे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी करताना चिंचवण डोंगरपट्यात सोमनाथ बडेंनी शिक्षण संस्थेच्या माध्यमातुन गरिबांच्या दरवाजात ज्ञानाची गंगा आणली. परोपकारी स्वभाव असल्याने त्यांच्यावर सर्वसामान्य माणसं प्रेम करतात असं त्यांनी सांगितले.




मक्रध्वज शिक्षण संस्था संचलित भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात ध्वजारोहण प्रसंगी प्रवक्ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आसाराम बडे, सोमनाथ बडे, नवनाथ तांबडे, अरूण बडे, शेख आबेद, श्रीमंत तांबडे, अर्जुन पौळ, विष्णु डोंगरे, दत्तु तुरे, इंद्रसेन बडे, यशवंत धायतिडक, नारायण बडे, शहादेव बडे, बद्रीनाथ म्हात्रे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. राम कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर शाळेच्या वतीने मान्यवरांचा शाल, श्रीफळ देवुन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातुन उपसरपंच मयुर बडे यांनी संस्थेच्या गुणात्मक कार्याचा आढावा सादर केला. प्रसंगी बोलताना सोमनाथराव बडे म्हणाले की, शिक्षण संस्था ज्या उद्देशापोटी स्थापन केली, तोच आदर्श डोळ्यासमोर ठेवत आम्ही काम करतो. गुणवत्तेच्या बाबतीत आमची शाळा डोंगरपट्यात चांगलं काम करत असुन त्याचे श्रेय मुख्याध्यापक, शिक्षकांना जाते. गोरगरिबांच्या सुखदु:खात जगणं हाच माझा खरा धर्म असुन लोकांचं प्रेम वर्षानुवर्षापासुन मला मिळतं त्याचा खुप आनंद वाटतो. मार्गदर्शनपर बोलताना प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात अहिल्यादेवी होळकरांचा संदर्भ देत त्यांचं चरित्र मुला-मुलींनी वाचन करावं. तत्कालीन काळात त्यांनी कशा प्रकारे जीवन जगताना जनकल्याणाची कामे केली?एक महिला कर्तृत्वाच्या आधारावर प्रदेशाचा कारभार आदर्शवत कशी करते?, दु:ख कितीही नशिबाला आलं तरीही शुद्ध भाव कर्माने त्यावर सामना करत धार्मिकतेच्या आधारे भारतीय संस्कृती टिकवुन ठेवताना त्यांनी ज्योतिर्लिंगाचा केलेला

जीर्णोद्धार त्यांची पुस्तके वाचुन प्रेरणा घेतली तर बालवयातच आयुष्यात पुढे जाण्यासाठी यश निश्चित मिळते. संतश्रेष्ठ भगवानबाबांनी संपुर्ण आयुष्य जनकल्याणासाठी समर्पित करताना ऊसतोड कामगार असो किंवा समाजातील अठरापगड जातीधर्माच्या उद्धारासाठी दिलेले योगदान फार मोठं एकरभर विका पण मुलं-मुली शिकवा हा त्यांचा संदेश खर्या अर्थाने जनकल्याणाच्या अत्यंत हिताचा होता. त्यांच्याच नावाने इथे शाळा चालवताना बाबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत सोमनाथ बडेंनी आयुष्यात गोरगरिबांची केलेली सेवा लोक कधीच विसरत नाहीत. सत्ता असो अथवा नसो त्यांच्या पाठीशी गोरगरिबांचा आशिर्वाद असतो. त्याचे कारण चिंचवण डोंगरपट्यात त्यांची नाळ सामान्य जनतेसोबत जोडलेली हे निश्चितच म्हणावी लागेल. बडे कुटुंब वारकरी संप्रदाय मार्गाचे अनुकरण करताना कष्ट आणि प्रामाणिकपणा हाच या परिवाराचा फार मोठा सद्गुण असल्याचेही कुलकर्णींनी सांगितले. मयुर सारखा तरूण या भागात ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन नेतृत्व करतो. त्याचं भविष्य उज्वल असल्याचेही संकेत त्यांनी दिले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, गावातील प्रतिष्ठित, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## डिजिटल मिडिया परिषदेचे संभाजीनगरमध्ये अधिवेशन

### विश्वस्त एस.एम. देशमुख यांची माहिती

मुंबई : प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम असलेल्या ‘‘डिजिटल मिडिया परिषदे‘‘ चे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती एस.एम. देशमुख यांनी दिली आहे..

डिजिटल मिडियात काम करणारया पत्रकारांसाठी अ. भा. मराठी पत्रकार परिषदेने डिजिटल मिडिया परिषद या नावाचा स्वतंत्र विभाग सुरू केला आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात आता डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या असून या माध्यमातील २००० पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले आहेत.. उर्वरित जिल्ह्यात शाखा स्थापन करण्याची प्रकिया सुरू आहे. परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणारया अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश आहे..

१४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होईल.. डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं होतील.. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे.. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणारया संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल. डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.. अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडली जाणार आहे.डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चॅंनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख नाही. ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत.प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.. त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे. अधिवेशनात त्यासंबंधी देखील चर्चा आणि विचारविनिमय होणार आहे.डिजिटल मिडियाच्या या पहिल्या अधिवेशनास डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, कार्यक्रमाचे निमंत्रक आणि संभाजीनगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे...

## श्री.गणेशाची कृपा अन् विनायकची मदत

### ऑपरेशनसाठी विनायक मुळेंनी केली आर्थिक मदत

वडवणी :प्रतिनिधी

गरिबीच्या ओझ्याखाली दबलेल्या एका गरीब कुटुंबातील महिलेच्या गंभीर आजारावर उपचार करणे अशक्यप्राय झाल्याचे विनायक मुळे यांच्या लक्षात येताच ऑपरेशनचा खर्च ऐकून कुटुंबातील मंडळींचे हात पाय गळून पडले होते.अशा कठीण प्रसंगी विनायक मुळे यांनी पुढाकार घेत माणुसकीची खरी ओळख पटवली.





बाहेगव्हण येथील गरिब कुटुंबातील शिवकन्या शेषेराव गोंडे या महिलेच्या घशाच्या ऑपरेशनच्या उपचारासाठी लागणाऱ्या खर्चामुळे ती महिला संकटात सापडली होती. ही वेळ ओळखून काल संकष्टी चतुर्थीच्या मुहुर्तावर ‘‘गणेशा‘‘ने ‘‘विनायक‘‘ ला बुद्धी दिली अन्? शिवसेनेचे वडवणी तालुकाप्रमुख विनायक मुळे यांनी पुढाकार घेत माणुसकीची ओळख जपली. संबंधित महिलेच्या ऑपरेशनसाठी आवश्यक ती आर्थिक मदत करून त्यांनी तिच्या कुटुंबाला मोठा दिलासा दिला.त्यांनी तातडीने आवश्यक ती आर्थिक मदत करून या कुटुंबाला नवसंजीवनी दिली. विनायक मुळेंच्या या मदतीमुळे आता महिलेचे ऑपरेशन होणार असून तिच्या जीवनात पुन्हा एकदा आशेचा किरण उजळला आहे.

विनायक बप्पा यांच्या या संवेदनशील कार्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.अनेकांनी त्यांच्या या पावलाला ‘‘गरजूंना आधार देणारे खरे समाजसेवक‘‘ अशी दाद दिली आहे.

यावेळी उपस्थित शिवसेना वडवणी तालुका प्रमुख विनायक मुळे,जेष्ठ शिवसैनिक बंडू मामा जाधव,सरपंच संजय धपाटे, अशोक गोंडे, तात्या जाधव, परमेश्वर नागवे, मच्छिंद्र जाधव,भागवत नागवे, विष्णुपंत मस्के, आण्णा नागवे, अनिल मस्के, रमेश पावले, मीनानाथ मस्के, नेताजी डांबे, सोपान नागवे, बाळासाहेब मोहिते, शाहादेव मस्के, सिद्धेश्वर जाधव, जगन्नाथ जाधव यासह बाहेगव्हाणचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सोन्नाखोटा येथे महादेव मंदिर जिर्णोद्धार भुमीपुजन

वडवणी:सोन्नाखोटा येथे नुकतेच ईच्छापूर्ती श्री.महादेव मंदिर जीर्णोद्धार भूमिपूजन सोहळा पार पडला.या मंदिर बांधकामाचे भूमिपूजन हभप नवनाथ महाराज गोरक्षनाथ टेकडीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

इच्छापूर्ती श्री महादेव मंदिर जीर्णोद्धार बांधकाम भुमीपुजन कार्यक्रम गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला हभप नवनाथ महाराज गोरक्षनाथ टेकडीकर होते.

हभप.रजपुत महाराज राजा हरिश्चंद्र पिंपरी देवस्थान तसेच जेष्ठ नेते सोमनाथराव बडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष महादेव जमाले, अशोकराव गोंडे सह आदींची उपस्थिती होती. आभार संयोजक महादेव खोटे महाराज यांनी व्यक्त केले.

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री विष्णु नारायण विश्वास पत्ता : रा.कुप्पा, ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. ४०० प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र. २६२६ साईज पु.प.३० फुट, द.ऊ. ४० फूट वर अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः प्रेमचंद जैन, पश्चिमः सदाशिव दराडे, दक्षिणः जाधव, उत्तर : २० फुट रस्ता

दिनांक : १२/०८/२०२६

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

# वडवणीच्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई जगताप यांनी दादांना बांधली राखी!



वडवणी:प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित पवार यांनी आपल्या वडवणी शहरातील दौऱ्यामध्ये नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांच्या निवासस्थानी भेट दिली. या भेटीत जगताप कुटुंबाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं यथोचित स्वागत केले. त्याचबरोबर सर्वत्र साजरा करण्यात आलेला रक्षाबंधन कार्यक्रम सुध्दा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांनी पाहिली राखी बांधून साजरा केला. त्यामुळे निश्चितच या ठिकाणी आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वडवणी शहरांमध्ये काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दौरा झाला.या दौऱ्यात त्यांनी आवर्जून नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांच्या सदिच्छा निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.यावेळी वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. वंदनाताई शेषेराव जगताप यांनी ना.अजित पवार यांना प्रेमपूर्वक राखी बांधून व औक्षण करून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.तसेच जगताप परिवाराच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा यथोचित सत्कार करत अत्यंत आदरपूर्वक स्वागत केले.

या भेटीदरम्यान वडवणी शहरातील विविध विकासकामांची माहिती व प्रगती अहवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सादर करण्यात आला.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन आणि पाठबळ यामुळे आमच्यासाठी नवे क्षितिज खुलं होत असल्याची प्रतिक्रिया नगराध्यक्षा यांचे पती शेषेराव जगताप यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी लोकप्रिय आ.प्रकाश सोळंके,आ.सतिष चव्हाण,आ. विक्रम काळे,युवा नेते जयसिंग सोळंके, युवा नेते योगेश क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, सह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व वडवणी शहरातील नागरिक उपस्थित होते.









## जाहिर प्रगटन

**जाहिर प्रगटन देणार – फिरोजबी पि. महंमद हुसेन कुरेशी,**
**वय ४० वर्षे, धंदा–घरकाम व शेती**
**रा. वडवणी ता. वडवणी जि. बीड**

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळवण्यात येते की, जाहिर प्रगटन देणार हे या जमीन गट नं. ६५७ शिवार वडवणी ता. वडवणी जि.बीड या जमीनीचे मालक व काबीज आहेत. तरी **बिलाल अमिन कुरेशी** यांनी तहसील. कार्यालयात गट नं. ६५७ मधील क्षेत्राची दुरुस्ती बाबत अर्ज दिलेला होता. ज्याचा आर.ओ.आर.क्रमांक २०१९/जमा–१/आरओआर/कावि–५३७ नुसार प्रकरण चालुन या प्रकरणात मा. तहसीलदार साहेब वडवणी यांनी सर्व पुराव्या आधारे दि. १६/१०/२०२० रोजी निकाल देऊन आक्षेप अर्जदार **फिरोजबी महमद हुशेन कुरेशी** यांचा अर्ज मंजुर करुन अर्जदार **बिलाल अमिन कुरेशी** यांचा अर्ज ना मंजुर करुन नामे १) हमिद अमिन कुरेशी २) रशिद अमिन कुरेशी **(मयत) चे वारस** १) साजेदा रशिद कुरेशी २) सिराज रशिद कुरेशी ३) शाकीब रशिद कुरेशी ४) तौफिक रशिद कुरेशी ५) शाहिन रफिक कुरेशी ६) परीन नासेर कुरेशी (३) मजिद अमिन कुरेशी (४) अब्दुल रहिम अमिन कुरेशी (लाल) ५) बिलाल अमिन कुरेशी वरील सर्व अमिन कुरेशी यांच्या वारसांना सदर गट नं. ६५७ मधील कोणतेही वडिलोपार्जित जमीन शिल्लक नसल्याचे आदेशात नमुद केले आहे. तसेच गट नं. ६५७मध्ये मुळ अमिन कुरेशी यांना १२ एक्कर १७ गुंठे व पो.ख.०४ गुंठे एवढेच क्षेत्र वाटुन आले होते. त्यापैकीं अमिन कुरेशी यांनी स्वतः जिवंत असेपर्यंत ०९ एक्कर ३५ गुंठे क्षेत्र विक्री केलेले आहे. तसेच सदरच्या गटातून बीड–परळी रस्त्यासाठीं अमिन कुरेशी यांच्या हिस्स्यातून ०१ हे.०६ आर क्षेत्र शासन संपादित झालेले आहे. परंतू सदर संपादनाचा फेरफार न झाल्याने सदरचे क्षेत्र अमिन कुरेशी व त्यांच्या वारसांच्या नावे तसेच शिल्लक राहिलेले होते. याचा गैरफायदा घेऊन अमिन कुरेशी यांच्या वारसांनी सदर गटातील ७५.३४ आर एवढे जास्तीचे क्षेत्र देखील विक्री केलेले असुन सदरचे क्षेत्र खरेदी करणारांना देखील भविष्यात अडचणी येणार आहेत. त्यामुळे तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की अमिन कुरेशी यांच्या वारसांच्या नावे असलेले क्षेत्र हे तहसीलदार यांनी दिलेल्या निकाला आधारे ७/१२ उताऱ्यावरुन कमी होणार असुन सदर क्षेत्राबाबत कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करु नये, केल्यास त्यांना पुढील कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल व सर्वस्वी जबाबदारी खरेदी करणारावर राहील.


करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येते.

दि.२७/१०/२०२०

ठिकाणी–वडवणी

**मार्फत**
**ॲड.पी.व्ही. तिडके**
**साळींबा रोड, वडवणी**

**जाहिर प्रगटन देणार**
**फिरोजबी पि. महंमद हुसेन कुरेशी**






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड – ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३–२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)